**महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम**
तंटयांची माहिती संकलनास मुदतवाढ

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय, क्रमांक तंमुगा १००९/सीआर-३७/पोल-१५,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : २८ सप्टेंबर, २००७.

**वाचा:-** गृह विभाग, शासन निर्णय, क्रमांक एमआयएस १००७/सीआर-२३८/पोल-८,
दिनांक १९ जुलै, २००७.

**शासन निर्णय:-**

संदर्भित दिनांक १९ जुलै, २००७ च्या शासन निर्णयान्वये "महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम" दिनांक १५ ऑगस्ट, २००७ पासून राज्यात सुरु करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद-७.२ (१) अनुसार तंटामुक्त गाव समितीने गावामधील दाखल असलेल्या दिवाणी, महसूली, फौजदारी व इतर तंटयांची माहिती ३० सप्टेंबरपर्यन्त संकलित करावयाची आहे. तथापि, तंटामुक्त गाव समित्या व प्रशासकीय अधिका-यांना गणेशोत्सवामुळे तथा राज्यातील सुरु असलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणूकांमुळे ही माहिती संकलीत करण्यास पुरेसा अवधी मिळालेला नाही. त्यामुळे सदर माहिती संकलनाची दिनांक ३० सप्टेंबर २००७ ची मर्यादा यावर्षासाठी वाढविण्यात येत असून ती दिनांक १५ ऑक्टोबर, २००७ पर्यन्त करण्यात येत आहे.

२. उक्त दिनांक १९ जुलै, २००७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-७.२(२)(ब) येथील तरतुदींच्या अनुषंगाने पोलीस ठाण्यांमधील कोणत्या कालावधीपासून प्रलंबित अदखलपात्र गुन्हयांची माहिती संबंधित गावातील तंटामुक्त गाव समित्यांना देण्यात यावी, याबाबत प्रशासकीय यंत्रणांकडून विचारणा होत असल्याने याबाबत शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ जानेवारी, २००६ पासूनची अदखलपात्र (N.C.) फौजदारी गुन्हयांची माहिती समितीस पोलीस यंत्रणेकडून देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मा. आ. गुट्टे
२८/९/०७
( मा. आ. गुट्टे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,
मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

सर्व विभागीय सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व परिक्षेत्रांचे विशेष पोलीस महानिरीक्षक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व पोलीस अधीक्षक,
सर्व उपविभागीय अधिकारी (जिल्हाधिकारी यांचेमार्फत)
सर्व उपविभागीय पालीस अधिकारी (पोलीस अधीक्षक यांचेमार्फत),
सर्व गटविकास अधिकारी (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत),
सर्व तहसीलदार (जिल्हाधिकारी यांचेमार्फत),
सर्व पोलीस ठाणे प्रमुख,
निवड नस्ती (पोल-१५).